MHAK060011662024

दाखल तारीख : ०८.०५.२०२४.
नोंदणी तारीख : १४.०५.२०२४.
निर्णय दिनांक : ०७.०३.२०२६.
कालावधी : व म दि
०१ ०९ २९

**दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर अकोट, जि. अकोला यांचे न्यायालयात**
( पिठासीन अधिकारी शिवनाथ एम. काळे )

**हिन्दु विवाह अर्ज क्रं. ९५/२०२४.** **निशाणी क्रं.१५.**

कपिल विजयसिंग ठाकुर (गौर),
वय अं. ३१ वर्ष, व्यवसायः शेती,
रा. दानापुर, ता. तेल्हारा, जि. अकोला. ... **अर्जदार.**

**– विरुध्द –**

१. सौ. पुजा उर्फ सोनु कपिल ठाकुर (गौर),
उर्फ सौ. पुजा उर्फ सोनु रोशनसिंग परीहार,
वय अं. २७ वर्ष, व्यवसाय– घरकाम,

२. रोशनसिंग गणेशसिंग परीहार,
वय अं. ३० वर्ष, व्यवसायः खाजगी नोकरी,
दोन्ही रा. बालाजी गल्ली, अंजिठा,
ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजी नगर. ... **उत्तरवादी.**

**हिंदु विवाह अधिनियम १९५५ च्या कलम १३(१) (i–अ ) (i–ब) नुसार विवाह विच्छेद करुन मिळणेबाबत.**

..........................................................................................................

श्री. आर.टी. मदनकार विद्वान अधिवक्ता अर्जदाराकरीता
उत्तरवादी विरुध्द एकतर्फा चालविण्यात आले

..........................................................................................................

**न्यायनिर्णय**
(घोषित दिनांक ०७/०३/२०२६)

प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने उत्तरवादीपासुन घटस्फोट मिळावा म्हणुन दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे थोडक्यात कथन असे आहे की, तिचा उत्तरवादीसोबत विवाह दि. १२.०३.२०२० रोजी हिंदु रितीरिवाजाप्रमाणे व जातीतील रिवाजाप्रमाणे वरखेडी खुर्द, ता. सोयगांव, जिल्हा छत्रपती संभाजी नगर येथे संपन्न झाला. लग्नानंतर अर्जदार ही उत्तरवादीकडे नांदायला गेली. अर्जदाराने उत्तरवादीस नेहमीच चांगले वागविण्याचा प्रयत्न केला परंतु उत्तरवादी क्रं.१ ही अर्जदारासोबत व त्याचे परीवारासोबत कधीही चांगली वागली नाही. तिने घरातले कुठलेही काम करण्यास नकार दिलेला होता. अर्जदाराने उत्तरवादी क्रं.१ हीला नेहमीच फोनवर रात्री अपरात्री कोणाशी तरी बोलतांना पाहीले होते. याबाबत त्याने उत्तरवादी क्रं.१ हीस समोरच्या व्यक्तीबद्दल विचारले परंतु तिने कुठलेही समाधानकारक उत्तर न देता अर्जदाराचा अपमान केला. अर्जदाराने उत्तरवादी क्रं.१ हिला समजावुन सांगण्याचा बराच प्रयत्न केला परंतु त्याचा काहीच उपयोग झाला नाही. मार्च २०२४ मध्ये अर्जदारास त्याचे नातेवाईकाकडून समजले की, उत्तरवादी क्रं.१ आणि उत्तरवादी क्रं.२ यांचे बेकायदेशिर लग्न झाले असून व ते दोघेजण पती–पत्नी प्रमाणे राहतात. उत्तरवादी क्रं.१ कधीही तिच्या पत्नीची जबाबदारी पार न पाडता उत्तरवादी क्रं.२ सोबत पती–पत्नी प्रमाणे राहत आहेत. या सर्व कारणास्तव अर्जदाराला शारीरीक व मानसीक त्रास सहन करावा लागला. या सर्व कारणास्तव अर्जदाराने उत्तरवादी क्रं.१ विरुध्द घटस्फोटाची मागणी केली आहे.

०३. दोन्ही उत्तरवादींना प्रकरणातील नोटीस तामील आहे परंतु त्यांनी कोर्टात येण्याचे टाळले आहे. या कारणास्तव प्रस्तुतचे प्रकरण त्यांचे विरुध्द एकतर्फा आदेश करुन प्रकरण पुढे चालविण्याचा आदेश झालेला आहे.

०४. खालील मुद्दे माझ्या निर्णयास्तव उद्भवले असुन माझे त्यावरील निष्कर्ष मी त्यांच्या समोर नोंदविले असुन त्यांची कारणे खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्रं. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | अर्जदार हे सिध्द करतो काय की, उत्तरवादी क्रं.१ ने त्याचे सोबत सुड भावनेने राहुन त्याच्यावर शारीरीक व मानसीक क्रुरता केली ? | – – | होय. |
| २. | अर्जदार हे सिध्द करतो काय की, त्यांचा व उत्तरवादीचा विवाह झाल्यानंतर प्रस्तुतचे प्रकरण दाखल करण्यापुर्वी उत्तरवादीने तिचा तीन वर्षाच्या अधिक कालावधीपासुन विनाखंड परित्याग केला ? | – – – – | अंशतः होय. |
| ३. | अर्जदार हा त्याच्या मागणीप्रमाणे दाद मिळण्यास पात्र आहे काय ? | | नाही. |
| ४. | काय आदेश व हूकूमनामा ? | – – | अर्ज अंतिम आदेशाप्रमाणे अंशतः मंजुर करण्यात आला. |

## <u>कारणमिमांसा</u>

०७. अर्जदाराने निशाणी क्रं.१३ अन्वये स्वतःला तपासलेले आहे. दोन्ही उत्तरवादी नोटीस तामील होवूनही प्रकरणात गैरहजर राहीले म्हणुन हे प्रकरण स्वतंत्ररित्या चालविण्यात आलेले आहे.

०८. अर्जदाराने त्याचे पुराव्याचा प्रतिज्ञालेख सिध्द करण्यासाठी स्वतःचे सरतपासणीचे शपथपत्र निशाणी क्रं.१३ वर दाखल केले आहे. तसेच अर्जदाराने त्याच्या पुराव्याच्या पुष्टर्थ लेखी पुराव्यात विवाहाची निमंत्रण पत्रीका निशाणी क्रं.१६, लग्नातील विवाहाचे फोटो आर्टीकल–'अ, ब व क' तसेच आधारकार्डची पडताळणीकृतप्रत निशाणी क्रं.१४ व १५ इ. कागदपत्रे सादर केली आहेत. तसेच अर्जदाराने साक्षीदार क्रं.२ दिलीपसिंग हरीसिंग ठाकुर यांचा पुरावा निशाणी क्रं.१७ व साक्षीदार क्रं.३ सचिन रामसिंग ठाकुर यांचा पुरावा निशाणी क्रं.१८ हे पुराव्याचे शपथपत्र दाखल करुन नोंदविलेले आहेत. अर्जदाराचे विद्वान विधीज्ञ यांनी युक्तीवादात

नमुद केले की, अर्जदाराच्या तोंडी व लेखी पुराव्यास आव्हान न दिल्याने त्याची मागणी मान्य करण्यात यावी.

**<u>मुद्दा क्रं.१ बाबत–</u>**

०८. अर्जदाराने सादर केलेल्या शपथपत्रातील मजकुर हा अर्जातील मजकुर सदृश आहे म्हणुन त्याची चर्चा थोडक्यात केलेली आहे. अर्जदाराचे पुराव्यात असे आले आहे की, तिचा व उत्तरवादीचा विवाह हा दि. १२/०३/२०२० रोजी वरखेडी खुर्द, ता. सोयगांव, जिल्हा छत्रपती संभाजी नगर येथे झाला आहे. तसेच त्यानंतर अर्जदार ही उत्तरवादीसोबत त्याच्या घरी नांदली आहे. अर्जदार व उत्तरवादी हे दानापुर येथे शेवटचे एकत्र नांदले आहे. अर्जदाराने त्याच्या तोंडी पुराव्यातील सदर कथनाचे समर्थनार्थ निशाणी क्रं.१६ ही विवाहाची निमंत्रण पत्रीका दाखल केली आहे. त्यावरुन अर्जदार व उत्तरवादी यांचा विवाह हा दि. १२/०३/२०२० रोजी झाल्याचे व अर्जदार व उत्तरवादी क्रं.१ यांचे संबंध विकोपाला गेल्याचे दिसून येते. अर्जदाराचा पुरावा कुठल्याही परीस्थतीत अर्थशुन्य आहे, असे कधीही मान्य करता येणार नाही. या सर्व कारणास्तव माझे मते उत्तरवादी क्रं.१ ही व्याभीचारी जिवन जगत आहे. अर्जदार नियमाप्रमाणे फारकत देण्याचा प्रयत्न निष्पळ ठरलेला आहे. आपसात कुठलीही बोलणी दोन्ही पक्षकारामध्ये झालेली नाही. या कारणास्तव मी मुद्दे क्रं.१ व २ चे उत्तर होकारार्थी देत असून मला आशा आहे की, फारकत घेणे व्यतीरिक्त या दोन्ही पक्षकारांना त्यांच्यावर होत असलेल्या जाचातुन मुक्त करावे म्हणुन मी मुद्दा क्रं.३ व ४ चे उत्तर म्हणुन खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. आदेशाच्या दिनांकापासुन दिनांक १२.०३.२०२० रोजीच्या विवाहाने प्रस्थापीत झालेले अर्जदार व उत्तरवादी क्रं.१ यांच्यातील पती–पत्नीचे नाते संबंध हिंदु विवाह अधिनियम १९५५ च्या कलम १३(१)(i–अ)(i–ब) अन्वये संपुष्टात आल्याचे घोषीत करण्यात येत आहे.

३. अर्जदाराने अर्जाचा खर्च स्वतः सोसावा.

४. अर्जदार व उत्तरवादीला सदरहू न्यायनिर्णयाची प्रत विनामुल्य पुरविण्यात यावी.

५. याप्रमाणे हूकूमनामा तयार करण्यात यावा.

SHIVNATH MANIKRAO KALE

Digitally signed by SHIVNATH MANIKRAO KALE
Date: 2026.03.10 16:37:11 +0530

दिनांक–०७.०३.२०२६.

(शिवनाथ एम. काळे)
**दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,**
**अकोट.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F file Judgment are same word for word as per original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | S. G. Jaiswal |
| Court Name | : | Civil Judge, S.D., Akot. |
| Date | : | 07/03/2026. |
| Order Signed by P.O on | : | 09/03/2026. |
| Order Uploaded on | : | 10/03/2026. |